नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांनी भविष्य निर्वाह निधी खातेदारास निधी वितरित करण्यापूर्वी खात्यामध्ये आवश्यक निधी आहे किंवा नाही याची पडताळणी/तपासणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्र.भनिनि-२०१९/प्र.क्र.१५/अर्थसंकल्प
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांकः ०१ जुलै, २०१९.

<u>संदर्भ</u> :- महालेखापाकार कार्यालय (लेखा व हकदारी), नागपूर यांचे दि.१२.०६.२०१९ चे पत्र.

शासन परिपत्रक

महालेखाकार कार्यालय (लेखा व हकदारी), नागपूर या कार्यालयामार्फत विदर्भ व मराठवाडा विभागातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्याची देखभाल करण्याचे काम सुपूर्द करण्यात आलेले आहे. नुकत्याच केलेल्या (Analysis) सर्वेक्षण/पाहणीनुसार असे निदर्शनास आले आहे की, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये आवश्यक निधी उपलब्ध नसताना देखील, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात Minus Balance वर निधी वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रक अधिकारी/आंहरण व संवितरण अधिकारी हे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये आवश्यक निधी आहे किंवा नाही, याची पडताळणी/तपासणी न करता परतावा/ना-परतावा निधी मंजूर करत आहेत. तसेच महाराष्ट्र जीपीएफ नियम १९९८ च्या नियम क्र.१३, १४, १६ चा अवलंब केला नसल्याचे आढळून येत आहे, असे महालेखाकार कार्यालय (लेखा व हकदारी) यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

२. ही बाब गंभीर असून, आपल्या कार्यालयाकडून यापुढे भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम खातेदारास वितरित करण्यापूर्वी त्याच्या खात्यामध्ये आवश्यक ती रक्कम शिल्लक आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यात यावी. तसेच यापूर्वी अशाप्रकारची चूक झाली असल्यास, तसे शासनास कळविण्यात यावे.

३. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०७०४१५४०४८३४२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.07.04 15:44:51 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
३) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
४) कक्ष अधिकारी (आस्थापना), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीस्तव :-

प्रधान सचिव, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.